नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS


वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १०६ | Issue - 106 | वार मंगळवार दि. २ सप्टेंबर २०२५ | Blow- Tuesday Date 2 September 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## सप्टेंबरमध्ये देशामध्ये दीर्घकालीन सरासरीच्या अधिक पावसाची शक्यता

### हवामान विभागाचा अंदाज; बहुतांश भागांमध्ये सरासरी किंवा अधिक पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशात १ जूनपासून ३१ ऑगस्टपर्यंत सरासरीच्या सहा टक्के पाऊस अधिक नोंदला आहे. हा पाऊस ३१ ऑगस्टपर्यंत सरासरीच्या श्रेणीत आहे. सप्टेंबरमध्ये पूर्ण देशामध्ये दीर्घकालीन सरासरीच्या अधिक पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने रविवारी वर्तवली. हा पाऊस सरासरीच्या १०९ टक्के पडू शकतो, असा अंदाज आहे. यामध्ये देशाच्या बहुतांश भागांमध्ये सरासरी किंवा अधिक पाऊस पडू शकतो, तर कोकण विभागात मात्र सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे.



देशामध्ये ईशान्य आणि पूर्व भारताचा काही भाग, दक्षिण भारताचा काही भाग, उत्तर भारताचा टोकाचा भाग येथे सप्टेंबरमध्ये सरासरीपेक्षा पाऊस कमी पडू शकेल. सप्टेंबर महिन्यामध्ये देशभरात सरासरी १६७.९ मिलीमीटर पाऊस पडतो. यंदा हा पाऊस सरासरीच्या १०९ टक्के पडू शकेल.

महाराष्ट्राच्या बहुतांश भागांमध्येही सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्राच्या तसेच दक्षिण आणि उत्तर कोकणाच्या काही भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. या पावसामुळे शेतीला काही ठिकाणी फायदा होऊ शकतो. मात्र त्याचबरोबर काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण होण्याचीही वेळ येऊ शकते याकडेही भारतीय हवामान विभागाने लक्ष वेधले आहे.

सप्टेंबर महिन्यातील पावसाचा परिणाम अर्थातच तापमानावर होणे अपेक्षित आहे. या कालावधीत देशातील सर्वसाधारण तापमान हे सरासरी किंवा त्याहून कमी असू शकेल. मात्र ज्या भागामध्ये सप्टेंबरमध्ये फारसा पाऊस नाही त्या भागांमध्ये हे तापमान चढे असेल. यामध्ये पूर्व आणि ईशान्येकडील बहुतांश भागाचा समावेश आहे.

कोकण विभागामध्येही सरासरीहून अधिक कमाल तापमान असेल अशी शक्यता आहे. सप्टेंबरमध्ये बहुतांश देशामध्ये किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त असू शकेल.

## अफगाणिस्तान भूकंपाने हादरले; ८०० जणांचा मृत्यू, २५००हून अधिक जखमी



काबूल: अफगाणिस्तानचा पूर्व भाग रविवारी रात्री पावणेबाराच्या सुमारास भूकंपाच्या धक्क्याने हादरला. या तीव्र भूकंपात सुमारे ८०० जणांचा मृत्यू झाला असून अडीच हजारांहून अधिक जण जखमी झाले.

अफगाणिस्तानातील नंगरहार प्रांतातील जलालाबाद शहरापासून २७ किमी ईशान्येकडे भूकंपाचा केंद्रबिंदू होता. पूर्वेकडील कुनार प्रांत या भूकंपामुळे हादरला. रिश्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ६.० एवढी मोजली गेली, असे 'यूएस जिऑलॉजिकल सर्व्हे'ने सांगितले. भूकंपाचे केंद्र भूपृष्ठापासून केवळ आठ किलोमीटर खोलीवर होते. त्यापाठोपाठ अनेक उपधक्के बसले.

बचाव पथकातील कर्मचारी कोसळलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्यांमधून जखमींना स्ट्रेचरवरून हेलिकॉप्टरकडे नेत असल्याचे व्हिडीओ चित्रण समोर आले आहे. हातांनीच ढिगारे उपसण्याचा प्रयत्न करत आपल्या कुटुंबीयांचा शोध घेणारे अफगाणी नागरिकही यात दिसत होते. भूकंपातील मृतांची संख्या ८०० वर पोहोचली असून दोन हजार ५०० जण जखमी झाले आहेत.

बहुतांश जीवितहानी कुनार प्रांतात झाली, असे तालिबान सरकारचे प्रवक्ते जबिहुल्लाह मुजाहिद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. अफगाणिस्तानच्या पर्वतीय, दुर्गम अशा पूर्व भागात झालेल्या या भूकंपामुळे दळणवळणाला मोठा फटका बसला आहे. भूकंपग्रस्त भागात बचावकार्य सुरू असून कुनार, नंगरहार आणि राजधानी काबुल येथील वैद्यकीय पथके या भागात पोहोचली आहेत, असे अफगाण आरोग्य मंत्रालयाकडून सांगण्यात आले. अनेक भागांतून जीवितहानीचे आकडे समोर आले नसल्याने मृतांची संख्या वाढण्याची भीती आहे.

**भारताकडून मदतीचा हात**

अफगाणिस्तानातील भूकंपातील जीवितहानीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी तीव्र दुःख व्यक्त केले, तसेच आपद्ग्रस्तांना शक्य ती सर्व मानवतावादी मदत पोहोचवण्यासाठी भारत तयार आहे, असे त्यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे स्पष्ट केले.

## दक्षिण मुंबईचे रस्ते खाली करा, हायकोर्टाचे मराठा आंदोलकांना निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचं मुंबईतील आझाद मैदानात उपोषण सुरु आहे. त्यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई महापालिका बाहेरचा परिसर, चर्चेगट स्थानक, हुत्मात्मा चौक या परिसरात आंदोलकांची मोठी गर्दी जमलेली बघायला मिळत आहे. दक्षिण मुंबईतील अनेक ठिकाणी आंदोलक पोहोचले आहेत. आंदोलकांच्या गर्दीमुळे दक्षिण मुंबईतील रस्ते जाम झाले आहेत. यामुळे मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर आज तातडीची सुनावणी पार पडली. यावेळी दोन्ही बाजूने बराच वेळ युक्तिवाद पार पडल्यानंतर मुंबई हायकोर्टाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. आंदोलकांनी आझाद



मैदान वगळता सर्व रस्ते मोकळे करावेत, असे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत.

प्रथमदर्शनी अंतरिम आदेशाचे उल्लंघन झाल्याचे दिसत आहे. मनोज जरांगे पाटील, विरेंद्र पवार आणि अन्य प्रतिवादींनी प्रथमदर्शनी आंदोलनासाठी मिळालेल्या परवानगीतील अटींचे उल्लंघन केले आहे. तसेच त्यांना आझाद मैदानातील आंदोलनासाठी सध्या कोणतीही परवानगी नाही. त्यामुळे २६ ऑगस्ट २०२५ रोजीच्या अंतरिम आदेशाप्रमाणे आणि सार्वजनिक सभा, आंदोलने २०२५ अंतिम नियमावलीतील नियमांप्रमाणे सरकारने योग्य ती कार्यवाही करावी, असे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत.

मुंबईतील जनजीवन सुरळीत होण्यासाठी आणि मुंबई ठप्प होऊ नये तसेच विशेषत: सध्याच्या गणेशोत्सवाबरोबर सर्व काळ आम्ही हे निर्देश आहोत. आंदोलकांनी रस्ते आणि सर्व संबंधित जागा आझाद मैदानातील विशिष्ट जागा वगळता उद्या दुपारपर्यंत मोकळ्या कराव्यात. उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत आंदोलकांनी रस्ते मोकळे करावेत आणि आझाद मैदानातील विशिष्ट जागा वगळता मोगळ्या कराव्यात, असा महत्त्वाचा आदेश मुंबई हायकोर्टाने दिला आहे. राज्य सरकार आणि पोलिसांनी खबरदारी घ्यावी की, आणखी येणारे आंदोलक मुंबईत येणार नाहीत, असा मोठा आदेश मुंबई हायकोर्टाने दिला आहे. आम्ही राज्य सरकारला आदेश देतो की, जर मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली तर त्यांना तात्काळ आवश्यक ते वैद्यकीय उपचार देण्यात यावेत, असा आदेश मुंबई हायकोर्टाने दिला. आता या याचिका नियमित खंडपीठासमोर उद्या दुपारी ३ वाजता सुनावणीसाठी ठेवण्यात येत आहेत, असेही खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले.

## सोलापुरातील लष्कर परिसरात एकाच कुटुंबातील पाचजण बेशुद्ध, तिघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरातील लष्कर परिसरात असलेल्या लोधी गल्लीत रविवारी (३१ ऑगस्ट) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास एकाच कुटुंबातील पाचजण बेशुद्ध अवस्थेत आढळले होते. रविवारी सायंकाळी उपचार सुरू असताना पाच पैकी हर्ष बलरामवाले (वय ६ वर्ष) आणि अक्षरा बलरामवाले (वय ४ वर्ष) या दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला होता. एकूण पाच जणांवर उपचार सुरू असताना रविवारी दोन आणि सोमवारी दुपारी विमल मोहनसिंग बलरामवाले (वय ६० वर्ष) या वृद्ध महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. त्यामुळे या घटनेतील मृतांची संख्या आता तीनवर पोहोचली आहे. पण, हा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.



याप्रकरणी मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, घरातील घरगुती सिलेंडरमधून गॅस गळती झाली त्यामुळे श्वास गुदमरून मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. रंजनाबाई युवराज बलरामवाले (वय ३५ वर्ष, दोघे रा. बेडरपूल लष्कर, लोधी गल्ली, सोलापूर) ही विवाहित महिला अतिदक्षता विभागात मृत्यूशी झुंज देत देत आहे. युवराज मोहनसिंग बलरामवाले (वय ४० वर्ष, रा. बेडरपूल, लोधी गल्ली, लष्कर, सोलापूर) हे शुद्धीवर आहेत.

सोलापूर शहरातील नळबाजार चौकातील बालाजी मठाच्या जवळच बलरामवाले यांचे घर आहे. त्यांच्या घराकडे जाण्यासाठी दुचाकीला जाण्याएवढी जागा, त्यांचे घर म्हणजे अंदाजे सात बाय दहाची खोली आहे. या एका खोलीत पाचजण दाटीवाटीने राहत होते. त्यात एका बाजूला गॅस शेगडी, दरवाजा उघडल्यानंतर समोरच टीव्ही दिसतो, त्याखाली पिण्याचे पाणी भरून ठेवलेली भांडी, घरातील इतर साहित्य हे एका बाजूला ठेवलेले आहेत. हर्ष बलरामवाले (वय ६० वर्ष), अक्षरा बलरामवाले (वय ४ वर्ष), विमल मोहनसिंग बलरामवाले (वय ६०) या तिघांचा मृत्यू झाला आहे. रंजनाबाई युवराज बलरामवाले (३५), युवराज मोहनसिंग बलरामवाले (४०, सर्व रा. बेडरपूल, लष्कर) हे मृत्यूशी झुंज देत आहेत. त्यांच्या रक्ताची तपासणी करण्यात आली. त्या तपासणीमध्ये कार्बन मोनॉक्साईडचे प्रमाण जास्त आढळले. यामुळेच त्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज लावण्यात येत आहे.

बलरामवाले कुटुंबाची परिस्थिती खूप हलाखीची आहे. कधी एक वेळचे जेवण मिळते, तर कधी मिळत नाही. शनिवारी (३० ऑगस्ट) रात्री त्यांनी एक किलो भात आणून खिचडी करून खाल्ली. त्यानंतर सगळे झोपी गेले. त्यानंतर रविवारी सकाळी ही घटना उघडकीस आली, अशी माहिती नातेवाईकांनी दिली. रविवारपासून शासकीय रुग्णालयात नातेवाइकांची मोठी गर्दी परिसरात झाली आहे.

**मंत्री छगन भुजबळ यांनी सर्व नेत्यांसोबत घेतली पत्रकार परिषद**

**...तर आम्ही कोर्टात जाऊ : छगन भुजबळ**

## ओबीसींच्या वाट्यात दुसरे वाटेकरी नको हीच एकमेव मागणी : भुजबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ओबीसी नेत्यांची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मंत्री छगन भुजबळ यांनी सर्व नेत्यांसोबत पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी आपली भूमिका मांडली. आज सगळे ओबीसी नेते महाराष्ट्रातले एकत्र जमले होते. तायवाडे उपोषण असल्यानं येऊ शकले नाही. काही ठिकाणी उपोषण सुरू आहे. आमदार पडळकर दूर असल्याने येऊ शकले नाहीत. आमदार एकनाथ खडसे काही अडचण असल्याने येऊ शकले नाहीत. पण सगळ्यांनी सांगितलं की, आम्ही सोबत आहोत. मुंबईत सुरू असलेल्याबाबत तुम्ही दाखवलं. मराठा आणि कुणबी एकच म्हणणं हा मूर्खपणा आहे, असं कोर्ट म्हणालं आहे. सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे, असं छगन भुजबळ म्हणाले.



मराठा समाज सामाजिक मागास नाही असे निरीक्षण नोंदविले आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही म्हणून सुप्रीम कोर्टाने यापूर्वी म्हटलं आहे. मराठा कुणबी एक होऊ शकणार नाही. महाराष्ट्रात मराठा मोर्चे निघाले, गुजरातला पटेल, हरियाणा जाटचे मोर्चे निघाले. त्यावेळी एक मुद्दा समोर आला होता. केंद्र सरकारने एक कायदा बनविला आहे. जे दलित, आदिवासी, ओबीसीत बसत नाही पण आर्थिक आणि शैक्षणिक मागास आहे पण सामाजिक मागास नाही, त्यांसाठी कायदा केला. एथड लागू झाले, त्यात १० टक्के दिले. त्यात केवळ ८ टक्के उमेदवार मराठा समाजाचे आहेत. हे सरकारने जाहीर केलं, असं भुजबळ म्हणाले. नंतर पाटीदार, जाट, गुजर आणि काबूचे आंदोलन मागे झाले. तरीसुद्धा काही नेते ऐकायला तयार नाहीत. तरी परत १० टक्के मराठा आरक्षण दिले. ते टिकविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री यांनी सांगितलं आहे. ओबीसीमध्येच द्या अशी मागणी करत आहेत. हैदराबाद गॅझेट सांगत आहे, उस्मानाबाद आणि लातूरचा विषय आहे. कुणबी ३ हजार ५६० आणि परत मराठा २ लाख लिहिले आहे. मराठा आणि कुणबी वेगळे आहेत असे त्यात नमूद आहे. लातूरमध्ये कुणबी आणि मराठा वेगवेगळे लिहिले आहेत. निजामशाहीच्या दप्तरात लिहिलं आहे. १ कोटी २४ लाख ७१ हजार लोकसंख्या आहेत. त्यात ३४ हजार कुणबी आहेत असे नमूद केलं. सर्रास आरक्षण देणार कसे काय?, असा सवाल छगन भुजबळ यांनी केला.

त्यांना आरक्षण द्यायला आमचा विरोध नाही. २७ मध्ये फक्त १७ टक्के शिल्लल राहिले आहे. त्यात ३७४ जाती आहे, त्यात त्यांना टाकू नका. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटलो, तिथं उपमुख्यमंत्री होते. मी सुप्रीम कोर्ट, गॅझेट सगळं दप्तर दाखवलं. हे ओलांडून गेलात तर दुसऱ्या दिवशी आम्ही कोर्टात जाऊ. तिकडे काहीही करा. आम्हाला कर्तव्य नाही. ते आणि सरकार पाहुन घेतील पण आम्ही तयारीला लागलो. उपोषण सुरू आहे आता उपोषण सुरू करू. ओबीसींच्या वाट्यात दुसरे वाटेकरी नको हीच एकमेव मागणी आहे, अशी भूमिका भुजबळ यांनी मांडली. १७ जाती ज्या समाविष्ट केल्या त्या पोटजाती होत्या.लिंगायत समाजाच्या होत्या. सगळ्या जातीच्या पोटजाती आहेत. २९ पोटजाती आहेत. त्यासाठी आयोगाकडे जावे लागते. नंतर सरकार स्वीकारते. परंतु मराठा समाज आला तेव्हा देशमुख, खत्री, ४ आयोगाने नकार दिला. आरक्षण देणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात नाही. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सुद्धा हातात नाही, असंही छगन भुजबळ म्हणाले. अशी कोणतीही जात ओबीसीत टाकू शकत नाही. शरद पवार यांनी फक्त अंमलबजावणी केली. कुठल्याही सरकारला किंवा कुणाला दोष देण्यात अर्थ नाही. उगीच कुणी हट्ट करण्यात अर्थ नाही. आम्ही जिल्ह्यात उपोषण करू, यात्रा काढू, मुंबईत लाखोंच्या संख्येने मोर्चा काढू. आमदारांची मागणी केली म्हणजे कायदा होत नाही. उद्या कुणीही काहीही मागणी केली तर होत नाही. सगळ्यांची शेती आहे. अधिवेशनात ठराव केला तरी होत नाही. नियमाचा रस्ता आहे, त्यानुसार जावे लागेल, असं मत भुजबळ यांनी मांडलं.

## संपादकीय....

### हायकोर्टाचे आदेश

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचं मुंबईतील आझाद मैदानात उपोषण सुरु आहे. त्यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई महापालिका बाहेरचा परिसर, चर्चेगट स्थानक, हुत्मात्मा चौक या परिसरात आंदोलकांची मोठी गर्दी जमलेली बघायला मिळत आहे. दक्षिण मुंबईतील अनेक ठिकाणी आंदोलक पोहोचले आहेत. आंदोलकांच्या गर्दीमुळे दक्षिण मुंबईतील रस्ते जाम झाले आहेत. यामुळे मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर तातडीची सुनावणी पार पडली. यावेळी दोन्ही बाजूने बराच वेळ युक्तिवाद पार पडल्यानंतर मुंबई हायकोर्टाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. आंदोलकांनी आझाद मैदान वगळता सर्व रस्ते मोकळे करावेत, असे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. प्रथमदर्शनी अंतरिम आदेशाचे उल्लंघन झाल्याचे दिसत आहे. मनोज जरांगे पाटील, विरेंद्र पवार आणि अन्य प्रतिवादींनी प्रथमदर्शनी आंदोलनासाठी मिळालेल्या परवानगीतील अटींचे उल्लंघन केले आहे. तसेच त्यांना आझाद मैदानातील आंदोलनासाठी सध्या कोणतीही परवानगी नाही. त्यामुळे २६ ऑगस्ट २०२५ रोजीच्या अंतरिम आदेशाप्रमाणे आणि सार्वजनिक सभा, आंदोलने २०२५ अंतिम नियमावलीतील नियमांप्रमाणे सरकारने योग्य ती कार्यवाही करावी, असे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. मुंबईतील जनजीवन सुरळीत होण्यासाठी आणि मुंबई ठप्प होऊ नये तसेच विशेषत: सध्याच्या गणेशोत्सवाबरोबर सर्व काळ आम्ही हे निर्देश आहोत. आंदोलकांनी रस्ते आणि सर्व संबंधित जागा आझाद मैदानातील विशिष्ट जागा वगळता उद्या दुपारपर्यंत मोकळ्या कराव्यात. उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत आंदोलकांनी रस्ते मोकळे करावेत आणि आझाद मैदानातील विशिष्ट जागा वगळता मोगळ्या कराव्यात, असा महत्त्वाचा आदेश मुंबई हायकोर्टाने दिला आहे. राज्य सरकार आणि पोलिसांनी खबरदारी घ्यावी की, आणखी येणारे आंदोलक मुंबईत येणार नाहीत, असा मोठा आदेश मुंबई हायकोर्टाने दिला आहे. आम्ही राज्य सरकारला आदेश देतो की, जर मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली तर त्यांना तात्काळ आवश्यक ते वैद्यकीय उपचार देण्यात यावेत, असा आदेश मुंबई हायकोर्टाने दिला. आता या याचिका नियमित खंडपीठासमोर उद्या दुपारी ३ वाजता सुनावणीसाठी ठेवण्यात येत आहेत, असेही खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले. दरम्यान जरांगे पाटील यांनी आझाद मैदानातच आमरण उपोषण आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केल्यानंतर पोलिसांनी अधिकाधिक पाच हजार रुपयांचाच जमाव जमवता येईल, यासह अनेक अटी घालून एक दिवसाची परवानगी दिली. त्यानंतर मराठा आंदोलकांची संख्या दिवसेंदिवस वाढत राहिली आणि पोलिसांना दरदिवशी नव्याने परवानगी देणे भाग पडले.

# नळदुर्ग येथील बालाघाट शिक्षण संस्थेच्या प्राध्यापकांनी चव सोडली, काय आदर्श घ्यावा या शिक्षकांचा

## दोन प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांसमोर अश्लिल भाषेत शिविगाळ करत एकमेकाची गचांडी पकडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात दि. २९ ऑगस्ट रोजी पतसंस्थेच्या कारणावरून दोन प्राध्यापकांमध्ये भांडण झाले. यावेळी या प्राध्यापकांनी अश्लील भाषेत शिवीगाळ करत एकमेकांची गचांडी धरली. प्राध्यापकांचा हा तमाशा विद्यार्थ्यांसमोर सुरु होता.अशा अश्लील भाषेत महाविद्यालयात विद्यार्थ्यांसमोर शिवीगाळ करणाऱ्या प्राध्यापकांवर बालाघाट शिक्षण संस्था कारवाई करावी अशी मागणी पालक वर्गातून होत आहे .




नळदुर्ग येथील बालाघाट शिक्षण संस्था संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आहे. बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हे काँग्रेसचे जेष्ठ नेते राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण हे आहेत. या महाविद्यालयात नळदुर्ग शहर व ग्रामिण भागातील विद्यार्थी खुप मोठया प्रमाणात शिक्षण घेत आसतात बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, कै. शिवाजीराव पाटील बाभळगावकर, कै. आलुरे गुरुजी व कै. नरेंद्र बोरगावकर या चार नेत्यांनी या कॉलेजची धुरा सांभाळली होती. या चारही नेत्यांनी विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेऊन काम केले आहे.

परंतू तेथील प्राध्यापकानी या चौघा विषयी काय केले स्वतः परिक्षण करावं दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी दहा ते साडे दहा वाजण्याच्या सुमारास महाविद्यालयामध्ये पतसंस्थेच्या कारणावरून विद्यार्थ्यांसमोर दोन प्राध्यापकांमध्ये कडाक्याचे भांडण झाले यावेळी या दोन्ही प्राध्यापकांनी अतिशय खालच्या पातळीवर एकमेकांना शिवीगाळ करत एकमेकांची गचांडी धरली. या प्राध्यपाकांचा हा तमाशा विद्यार्थ्यांसमोर सुरु होता. ते विद्यार्थानी काय आदर्श घ्यावा ही परिस्थिती निर्माण झाली आहे . ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न तर करावा परंतू आशा संस्थेची आब्रु वेशीवर टांगणाऱ्या प्राध्यापकावर कारवाई करावी.

सध्या महाविद्यालयात पदवीच्या परीक्षा सुरु आहेत त्यामुळे विद्यार्थी मोठया संख्येने महाविद्यालयात उपस्थित होते. त्यांच्यासमोर या प्राध्यापकांनी हे निंदनीय कृत्य केले असुन विद्यार्थ्यांसमोर अश्लील भाषेत शिवीगाळ करणाऱ्या या प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांनी काय आदर्श घ्यावे?

या घटनेबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांना विचारले असता त्यांनी विद्यार्थ्यांसमोर अश्लील भाषेत शिवीगाळ करणाऱ्या प्राध्यापकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

आगर बालाघाट शिक्षण संस्था संचलित कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग कॉलजची बदनामी करणाऱ्या प्राध्यापकावर कारवाई नाही झाल्यास या ठिकाणी मोठे आंदोलन करावे लागणार आहे अशा प्रकारचे निवेदन नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे यांनी संबंधित कॉलेजचे प्राचार्य सुभाष राठोड यांच्याकडे देण्यात आले आहे.

# फलटण-पंढरपूर प्रास्तावित १०४ किमी लांबीच्या रेल्वे मार्गात स्थानिक रहिवाशांच्या विरोध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : फलटण पंढरपूर प्रास्ताविक १०४ कि.मी. लांबीच्या रेल्वेमार्गाची सुमारे प्राथमिक सर्वेक्षण ब्रिटिश कालीन काळात सुमारे १०२ वर्षांपूर्वी झाले होते. या रेल्वेमार्ग घनदाट नागरी वस्ती मधून न नेता पंढरपूर शहराच्या बाहेरून, उपलब्ध मोकळ्या जागेतून वळविण्याची मागणी इस बावी,टाकळी ,वाखरी, येथील रहिवासी व लाड धारकांनी केली आहे. उपस्थितीत फेर सर्वेक्षण सुरू असून याबाबत भूमी अभिलेखा व महसूल कार्यालयातून माहिती मिळत आहे.

दरम्यान, इसवी टाकळी येथील गट क्रमांक, ३९,४०,५२,पै.५३,५६,पै.५८,५९,६०,६२,६३,६४,७९,८०,८०,पै.४२०/६,४२१, गट वाखरी हद्द या भागात गेल्या पन्नास वर्षापासून पिढी जात शेकडो कुटुंबे वास्तव्यास आहे, या परिसरात घरी आपारमेंट, शाळा महाविद्यालय व्यवसायिक आस्थापना, पेट्रोल पंप आदी पायाभूत सुविधा उभारल्या गेल्या आहेत, रहिवाशांच्या मते, प्रस्तावित मार्ग जर याच नागरी भागातून गेला तर शेकडो कुटुंबाचे विस्थापन बेरोजगारी ,विद्यार्थ्यांची शैक्षणिक, तसेच सामाजिक व आर्थिक अस्थिरता निर्माण होणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाला तीव्र विरोध असून विकासाला विरोध नसल्याने त्यांनी स्पष्ट केले, मात्र जुना १०० वर्षांपूर्वीचा सर्वे घेऊन आज हजारो लोकांना बेगर करणे योग्य ठरणार नाही असे रहिवाशांचे म्हणणे आहे.

रहिवाशांनी पुढील तीन मुद्द्यावर भर दिला आहे.

रेल्वे मार्ग नागरी वस्तीतून न नेता, शहराच्या पारिघावरून पर्यायी मोकळ्या जागेतून मिळवावा.

मागील दशकात रेल्वे प्रशासनाने केलेल्या सर्वेक्षणाचा पुनर्विचार करून, नागरी वस्ती बाधित न होणारे पर्याय स्वीकारावेत.

रावशांच्या मतांचा विचार करून नव्या मार्गाचा आराखडा केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून निश्चित करावा.

या मागणीसाठी सर्व रहिवासी व प्लॉट धारकांच्या वतीने मा. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे तसेच मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा चंद्रकांत दादा पाटील, मा आमदार अभिजीत पाटील, मा. आमदार प्रशांत परिचारक निवेदन सादर करण्यात आले असून तात्काळ कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त करण्यात आले आहे यावेळी माजी नगरसेवक नवनाथ रानगट, सागर वाघमारे बाळ कुंभार, श्याम तापडिया, भाऊसाहेब जगताप, युवराज मुळे, राजू वरपे व इतर उपस्थित होते.

# क्षमता असणाऱ्यांना बाहेर ढकलणे व नसणाऱ्यांना आमंत्रित करून लाभापासून वंचित ठेवणे म्हणजे क्रिमीलेअर होय : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे क्रिमीलेअरचे समाज जीवनावर होणारे दुरगामी परिणाम आणि आपली भूमिका. या प्रासंगिक विषयावर १२९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा २४ ऑगस्ट २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, क्रिमीलेअरचा इतिहास तपासून पाहत असतांना १९७१ ला सत्तनाथन आयोगाने प्रथमतः शिफारस केल्याचे आढळते. पुढे १९९२ ला मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार ओबीसींसाठी आरक्षणाची अंमलबजावणी करीत असताना इंद्र सहानी विरुद्ध भारत सरकार या खटल्यात आरक्षणाची मर्यादा ५० टक्के करणे व ओबीसीला क्रिमिलेअर लावणे गरज नसताना बंधनकारक करण्यात आले. क्रिमीलेअर साठी सुरुवातीला १९९३ मध्ये पालकाच्या उत्पन्नाची मर्यादा एक लाख रुपये होती. तर आता २०१७ पासून ती आठ लाख करण्यात आली आहे. सक्षम नसल्यामुळे लाभापासून वंचित राहणाऱ्यांना लाभार्थी बनविण्यासाठी त्यांच्यात क्षमता विकसित व्हावी यासाठी शासनाने उपाययोजना केल्या पाहिजेत. जेणेकरून क्रिमीलेअर लावण्याची वेळ येणार नाही. क्रिमीलेअर लागू करणे म्हणजे क्षमता असणाऱ्यांना प्रवाहा बाहेर ढकलून क्षमता नसणाऱ्यांना प्रवाहात येण्यासाठी आमंत्रण देऊन दोन्हीला लाभापासून वंचित ठेवण्याचे हे राज्यकर्त्यांचे षडयंत्र आहे. करिता कुठल्याही संवैधानिक समूहाला क्रिमिलेअर लावू नये किंवा त्यांचे उपवर्गीकरण करू नये. परिणामी एकजिनसी भारतीय समाज निर्माण होऊ शकेल. त्यासाठी प्रबोधन हा दीर्घकालीन लढा असला तरी त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून अज्ञानी समाजाला उपवर्गीकरण व क्रिमीलेअरचे दुष्परिणामाच्या अनुषंगाने सज्ञानी करण्याची भूमिका आपण पार पाडली पाहिजे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना ॲड. अविनाश थिटे म्हणाले की, क्रिमिलेअर हा

**१२९ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

देशव्यापी मुद्दा आहे. १९९२ ला ओबीसींना आरक्षण लागू करत असताना ओबीसीतील उच्चभ्रूणा क्रिमीलेअर ची अट लावण्यात आली. आजचा श्रीमंत हा उद्या श्रीमंत असेलच असे नाही. त्यामुळे आर्थिक आधारावर अशा प्रकारची अट लागू करणे सामाजिक दृष्ट्या योग्य नाही. पुरेशा प्रमाणात सांख्यिकीय माहिती उपलब्ध नसताना अशी अट एससी, एसटी ना सुद्धा लागू करणे योग्य होणार नाही. त्यामुळे समाजात अराजकता निर्माण होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे घटनेतील कलम १४, १५, १६ ची पायमल्ली होणार आहे. परिणामी समूहातील परस्परांत तेढ निर्माण होईल. तरी जाती जातीत भांडणे लावून बंधुत्व समाप्त करू नये. अशाप्रकारे एकजिनसी समूहांना विभाजित करून विकलांग करण्याचे षडयंत्र सुरू आहे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते ड. राजू बागुल म्हणाले की, आरक्षणाची व्यवस्था जगभरात लागू आहे मात्र त्याचे नामाभिधान वेगवेगळे आहेत. गोविंद वल्लभ पंत यांनी आरक्षणाला विरोध दर्शविला तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते कि, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्याकरिता प्रतिनिधित्वाची व्यवस्था करणे म्हणजे आरक्षण होय. समाज जीवनात आम्हाला बदल होत असताना सामाजिक लोकशाहीच्या अस्तित्वासाठी व्यक्तीच्या विद्वत्तेला नैतिकतेची जोड असणे आवश्यक आहे. आरक्षणाच्या उपवर्गीकरणातील मुद्द्यावर न्यायाधीश बेला त्रिवेदी यांनी आपला नकाराधिकार वापरला होता. याची आपण विशेष नोंद घेतली पाहिजे. अशाप्रकारे एससी, एसटी चे उपवर्गीकरण करणे तसेच त्यांना क्रिमिलेअर लावणे संयुक्तिक ठरणार नाही. याप्रसंगी उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, आंबेडकराईट आंदोलनाचा कारवा पुढे ओढण्याचे काम सुशिक्षितानी हव्या त्या प्रमाणात केले नाही. अनुसूचित जातीत ५९ जाती असताना केवळ बौद्धच त्यासाठी लढताना दिसतात. दहा दहा वर्षे एकत्र राहणाऱ्या व्यक्तींना आपण एकाच समूहातील असल्याचे जाणीव नसणे हे फारच भयानक आहे. इंजि. प्रकाश उजगरे म्हणाले की, कार्यशाळेतून पुढे आलेली वास्तविकता इतरांपर्यंत पोहोचविले पाहिजे आणि अनिष्ट चालीरीतींना पायबंद घातला पाहिजे. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, असमान समूहाला समान पातळीवर आणण्यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या पाहिजेत. आरक्षणाची तरतूद असताना सुद्धा संबंधित लाभार्थ्यांपर्यंत ते पोहोचू दिले जात नाही, याचाच एक भाग म्हणजे क्रिमीलेअर होय. तरी शांतीने क्रांती केली पाहिजे. नामविस्ताराचे उत्सव विद्यापीठ गेटच्या बाहेर होतात, जे विद्यापीठाच्या आत व्हायला पाहिजेत. म्हणून व्यवस्थेत घुसले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके, प्रास्ताविक इंजि. किशोर पाटील यांनी तर आभार साधू आनंद यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, इंजिनीयर किशोर पाटील, ॲड. राजू बागुल, प्रकाश उजगरे, सिद्धार्थ गायकवाड, यशोदीप नवगिरे, विशाल रगडे, उद्योजक शशिकांत काळे, प्रा. शिवम गायकवाड, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

## उद्योजक राम माने यांची माहिती

# ज्ञानरूपी वृक्ष प्रा. लि. कंपनीच्या वतीने राज्यस्तरीय उद्योग मेळाव्याचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

: सोलापूर/प्रतिनिधी : पिंपरी चिंचवड येथे ७ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय उद्योग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्ञानरूपी वृक्ष प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संस्थापक डायरेक्टर आणि आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते राम माने यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना दिली.

या राज्यस्तरीय उद्योग मेळाव्याचे उद्घाटन ज्ञानरूपी वृक्ष प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे डायरेक्ट राम माने साहेब यांच्या हस्ते होणार असून कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी रवींद्र चांदणे साहेब हे असणार असून या उद्योग मेळाव्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेचे प्रमुख सुधीर जावळे साहेब यांच्या सह केंद्र सरकारचे अधिकारी रितेश रंगारी साहेब तसेच सोलापूर येथील वरिष्ठ संपादक तथा पत्रकार महेश गायकवाड उद्यान अधिकारी दयानंद चव्हाण उद्योजिका रुपाली गायकवाड स्मृती मसाले ग्रुप च्या प्रमुख पौर्णिमा कदम मॅडम गौतम वाघवेकर व उद्योजिका प्रमिला चांदणे मॅडम तसेच विशाल खुणे, व राजू थोरात, हे सर्वजण उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या राज्यस्तरीय मेळाव्यात येणाऱ्या सर्वांचे स्वागत अध्यक्ष रजनीकांत क्षीरसागर हे करणार असून युवराज तिकीटी सर हे या कार्यक्रमाचे सूत्र संचालन करणार आहेत.

समाजाची आर्थिक धार्मिक शैक्षणिक राजकीय प्रगती करण्यासाठी, दहा कोटी सोशल वर्कर बुद्धिस्ट ग्रुप, ज्ञानरूपी वृक्ष प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, समाजाची आर्थिक धार्मिक शैक्षणिक राजकीय प्रगती करण्यासाठी समाज संघटित करण्यासाठी समाजाला उद्योजक बनवण्यासाठी ७ सप्टेंबर २५ रोजी हा उद्योग मेळावा आयोजित केला आहे, या मेळाव्यात जे काही प्रॉडक्ट बनवत आहे मॅन्युफॅक्चरिंग करत आहे त्याचे सॅम्पल घेऊन कार्यक्रमाला उपस्थित रहावे तुम्ही बनवलेला सर्व प्रॉडक्ट ही कंपनी विकत घेणार आहे, जे कोणी प्रॉडक्ट बनवत नसेल तेच प्रॉडक्ट ही कंपनी बनवणार आहे, ही कंपनी समाज बांधवाबरोबर कॉम्पिटिशन करणार नाही सर्वांना सोबत घेऊन त्यांचं प्रॉडक्ट विकत घेऊन मार्केटमध्ये विकणार आहे.

> **समाजाची आर्थिक परिस्थिती मजबूत झाली पाहिजे यासाठी नवीन उद्योजक सुद्धा तयार करायचे आहेत . त्यासाठी कंपनीचे दुकान प्रत्येक शहरांमध्ये तालुक्यामध्ये गावामध्ये उपलब्ध होणार आहेत ऑनलाइन घरपोच सुविधा उपलब्ध आहे,**
>
> **- उद्योजक राम माने**
> **ज्ञानरूपी वृक्ष प्रायव्हेट लिमिटेड कंपनी**

# परिवर्तन मिशन फाउंडेशन चे विद्यार्थी परकिय जापनिज (JLPT) भाषा परीक्षेत उत्तीर्ण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : परिवर्तन मिशन फाउंडेशन पुणे च्या माध्यतून परकीय भाषा व त्या मधील जागतिक करिअर च्या संधी हा उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमा अंतर्गत जपानी भाषा परिक्षेत बसविण्यात आलेल्या विद्यार्थ्या पैकी पाच विद्यार्थ्यानी या परिक्षेत उत्तिर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.

ग्रामीण भागातील तरूणाना परकीय भाषा व त्या मधील जागतिक करिअर च्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशान परिवर्तन मिशन फाउंडेशन पुणे हे काम करत असून त्यांचा एक उपक्रम म्हणजे जपानी भाषा JLPT(Japanese Language Proficiency Test) या परिक्षेची पूर्व तयारी करून तरुणाना या परिक्षेत बसविले जाते.नुकतच या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परिक्षेत परिवर्तन मिशन फाउंडेशनच्या पाच (५) विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे.

या मध्ये सिद्धार्थ गायकवाड, पुजा सौदागर, विपश्यना गावंडे, जान्हवी दांडगे, सम्यक गोपनारायण हे पाच विद्यार्थी आहेत.ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर हे ग्रामीण भागातील विद्यार्थी जपान मध्ये शिक्षण व नोकरी करू शकतात.परिवर्तन मिशन फाऊंडेशन चे संस्थापक किशोर भगत यांनी व मित्र परिवारानी या पाच ही उत्तिर्ण विद्यार्थ्यांचे आभिनंदन केले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या जागतिक संधीचा फायदा करून घ्यावा असे आवाहन फाऊंडेशन चे संस्थापक किशोर भगत यानी केले आहे.

परिवर्तन मिशन फाऊंडेशन च्या या उपक्रमामुळे अनेक जागतिक संधी व माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत आहे.

ग्रामीण परिसरातील चार विद्यार्थी आज जागतिक स्तरावर आपली छाप उमटवत आहेत.

अधिक माहितीसाठी व मोफत परदेशी भाषा प्रशिक्षणासाठी भेट द्या :

www.parivattan.org

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भाजपचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांचा जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा

## आझाद मैदानावर जावून प्रणव परिचारक यांनी पाठिंब्याचे दिले पत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावी यासाठी मनोज तरंगे पाटील यांनी आधार मैदानावर अमरन उपोषण सुरू केले आहे. आज उपोषणाच्या चौथ्या दिवशी पंढरपूरची माजी आमदार, भाजप नेते प्रशांत परिचारक यांच्या पाठिंबाची पत्र प्रणव परिचारक यांनी आझाद मैदानावर जाऊन पत्र दिले.






मुंबईमध्ये सुरू असलेल्या आरक्षण लढ्यामध्ये पंढरपूर मंगळवेढा सह सोलापूर जिल्ह्यातील अनेक मराठा बांधव सामील झाले आहेत. या आंदोलनाला पंढरपूरची आमदार समाधान आवताडे माडे जे आमदार अभिजीत पाटील, युवक नेते भगीरथ भालके, राष्ट्रवादी अजित पवार गटाची नीती अनिल सावंत, मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे, आता यामध्ये पंढरपूरची माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या वतीने त्यांचे पुतणे प्रणव परिचारक यांनी आजार मैदानावर जाऊन जणांची पाटलाच्या आंदोलनाला परिचारकांच्या पांडुरंग परिवाराच्या वतीने पाठिंबाची पत्र दिले आहे. तसेच आरक्षण मिळवण्यासाठी सरकार दरबारी पाठपुरावा करू अशी ग्वाही देखील यावेळेस प्रणव परिचारक यांनी दिली, या आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा बांधवांनी प्रणव परिचारक यांनी सविस्तर चर्चा देखील केली. यावेळी भाजपची माजी तालुकाध्यक्ष भास्कर कजगावणे पंढरपूर पंचायत समितीचे माजीरं उपसभापती प्रशांत देशमुख यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## क्रांतिकारक, भक्तांतील परमभक्त, शतकानुशतके आपल्या विचारांचा, कवित्वाचा ठसा मानवी जीवनावर उमटवणारा महामानव संत तुकाराम महाराज : योगेश सोमण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : श्री तुकाराम महाराज संतांचे संतश्रेष्ठ, नस्तीकांते नास्तिक, बंडखोरातील बंडखोर, क्रांतिकारकांचे क्रांतिकारक, भक्तांतील परमभक्त, शतकानुशतके आपल्या विचारांचा, कवित्वाचा ठसा मानवी जीवनावर उमटवणारा महामानव संत तुकाराम महाराज होते. असे योगेश्वर लिखित आनंद स्वरूप सादरकर्ते योगेश सोमण एक पात्री नाटकातून बोलत होते. ते विवेकानंद प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सव व्याख्यान मालेच्या चौथे पुष्प गुफतांना योगेश सोमण बोलत होते. कार्यक्रमाचे शुभारंभ दीप प्रज्वलन गणेश प्रतिमा पूजन उपस्थित मान्यवर आनंदडोही कलावंत योगेश सोमाण -प्रशांत शिंपी, प्रताप भोसले सुरेश पाटील व खंडेराव घाटगे यांचे हस्ते करण्यात आला. योगेश सोमण याचे सत्कार डॉ.बसवराज चिणकेकर याच्या शुभ हस्ते करण्यात आले.

आनंदडोही नाट्य सादर करताना सोमण म्हणाले अशा या संत श्रेष्ठाचा जीवन वेध घेतलाय या नाट्य प्रयोगातून.इंद्रायणीच्या डोहात गाथा बुडवल्या आणि तेरा दिवसांनी त्या तारल्या गेल्या. या तेरा दिवसातील तुकाराम बुवांचा आणि आवलीचा आपल्याशी आणि आत्म्याशी घडलेला संवाद म्हणजेच आनंदडोह हि कलाकृती. आनंदडोही नाट्य सादर करताना श्री तुकाराम महाराजांचे विचार जीवनातील नाट्य अत्यंत प्रभावीपणे या कलाकृतीत सोमण यांनी मांडले आहे. या वेळी प्रवीण शहा, शिवानंद वाले अशोक पोतदार, गुरुपाद आळगी, मल्लिनाथ मसुती,विलास कोरे, अप्पा हलगुनकी महेश कापसे, आप्पासाहेब पाटील यांच्यासह शेकडो श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुत्रसंचलन निशिगंधा कोळी व ओळख बापूजी निंबाळकर व आभार चंद्रकांत दसले यांनी केले.

## नवी भाजपा पुणे जिल्हा कार्यकारणी जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**प्रविण माने यांच्यावतीने मान्यवरांचा सन्मान**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : भारतीय जनता पार्टी पुणे जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये इंदापूरचे आकाश'जी कांबळे यांना भाजपा पुणे जिल्हा सरचिटणीस पद तर गजानन भाऊ वाकसे यांना ओबीसी मोर्चा अध्यक्ष पुणे जिल्हा, शिवाजीराव निंबाळकर हे जिल्हाउपाध्यक्ष, नानासाहेब शेंडे यांना जिल्हा चिटणीस पद, तसेच प्रवीणकुमार शहा यांना पुणे जिल्हा व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी निवड झाली.

या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा प्रविण माने यांनी सत्कार करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. देशाचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय नरेंद्र'जी मोदी व महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री आदरणीय श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली विकसीत भारताची व भारतीय जनता पक्षाची ध्येय धोरणे प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचवून त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

नव्याने करण्यात आलेल्या या निवडीमुळे भविष्यात पक्षाची ताकद आणखी वाढणार असून, सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणावर आमच्या पक्षाशी जोडला जाणार असल्याची भावना यावेळी प्रविण माने यांनी व्यक्त केली.

## सैनिक टाकळीतुन पाच हजारांहून अधिक भाकरी, शेंगदाणा चटणी,लोणचे; मराठा आरक्षण आंदोलन कर्ते मुंबईसाठी रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सैनिक टाकळी / संजय चव्हाण : सैनिक टाकळी ता.शिरोळ येथुन मराठा समाज बांधवांसाठी वेगवेगळ्या माध्यमातून मदत होत आहे आज सैनिक टाकळी गावातून भाकरी, चटणी, लोणचं, अशी सामग्री मुंबईला मराठा समाज बांधवांसाठी पाठवले आहे. गावातील सर्व घरातून भाकरी गोळा करून मराठा समाज बांधवांसाठी सैनिक टाकळीतील माता भगिनींनी तसेच सर्व जाती जमातीच्या लोकांनी याच्यासाठी सहकार्य केले. गावातील सर्व गणेश मंडळांनी पुढाकार घेऊन भाकरी गोळा करून मुंबईला मराठा बांधवांसाठी पाठवल्या. सैनिक टाकळीतील माता-भगिनींनी बोलताना म्हणाल्या की आंदोलन किती दिवस चालून दे मुंबईहून आरक्षण घेतल्याशिवाय परत यायचं नाही लागलं तर प्रत्येक दिवशी जेवणाची व्यवस्था इथून आम्ही बनवून देण्यास तयार आहोत. सैनिक टाकळीतील मराठा आरक्षणासाठी आपल्या परीने जमल त्या स्वरूपात भरपूर मदत केली आहे. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत हा लढा टिकून ठेवा अशी प्रत्येक नागरिकांची इच्छा होती.

## ७ सप्टेंबर रोजी आद्य क्रांतीवीर उमाजी राजे जयंती सोहळा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित संपन्न होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : इंग्रजांना सळोकी पळोकी करणारे आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी जयंती भिवडी ता.पुरंदर येथे संपन्न होणार आहे यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थितीत राहणार आहेत अशी माहिती जयमल्हार क्रांती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दौलतनाना शितोळे यांनी दिली.



सासवड येथे आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बोलताना दौलतनाना शितोळे यांनी वरील माहिती दिली.

यावेळी पुढे बोलताना शितोळे म्हणाले, ब्रिटीश साम्राज्या विरोधात पहिले बंड करणारे आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक, हे राज्यातील अखंड रामोशी बेरड समाजाचे दैवत आहे, परंतु त्यांचा इतिहास हा झाकला गेला होता, जयमल्हार क्रांती संघटनेच्या प्रयत्नातून आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने, त्यास उर्जित अवस्था प्राप्त झाली असून, राज्यात रामोशी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. आमच्या मागणीनुसार राजे उमाजी नाईक यांची शासकीय जयंती सर्व कार्यालयात सुरु झाली आहे, त्यांच्या नावाने पोष्टाचे तिकीट सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे रामोशी समाजात नवचैतन्य निर्माण झाले असल्याने या वर्षी राज्यभरातुन लाखोंच्या संख्येने रामोशी बेरड समाज या जयंती सोहळ्यास उपस्थित राहणार आहे.

इतर महापुरुषांच्या तुलनेत राजे उमाजी नाईक यांचे देखील बहु उद्देशीय राष्ट्रीय स्मारक व्हावे त्यासाठी १० एकर जागा मिळावी अशी मागणी आम्ही केली होती , परंतु शासनाने आम्हाला दिवे येथे ५ एकर जागा दिली आहे, पन्नास कोटी रुपये खर्च करुन त्या ठिकाणी भव्य असे उमाजी राजे नाईक यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे, त्याची घोषणा येत्या ७ सप्टेंबरला राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त भिवंडी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार आहेत, या जयंतीनिमित्त राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे मंत्री अतुल सावे, या बरोबर राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री यांना आणण्याचा आमचा प्रयत्न आहे असेही दौलतनाना शितोळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, यावेळी, जयमल्हार क्रांती संघटनेचे राज्याचे अध्यक्ष अंकुश जाधव, गणपतआण्णा शितकल गंगाराम जाधव, बिट्टूशेट तथा यशवंत भांडवलदार, यांसह जयमल्हार क्रांती संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे स्वागत समारंभ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे आज नवनवीन प्रवेशाने प्रवेशित झालेले प्रशिक्षणार्थी यांचे स्वागत करण्यात आले सर्वप्रथम संस्थेचे आयएमसी चेअरमन माननीय श्री राजशेखर हिप्परगी साहेब यांचे स्वागत संस्थेचे जेष्ठ निदेशक श्री एम जी नदाफ यांचे हस्ते करण्यात आले प्रास्ताविक मध्ये संस्थेचे निदेशक श्री विजय बोंगाळे सर श्री घोडके सर श्री अक्षय वाघमारे सर व सौ रेणुका गवल मॅडम यांनी नवीन प्रवेशित झालेले प्रशिक्षणार्थ्यांना संस्थेची ओळख संस्थेचे नियम शिस्तीचे नियम समजावून सांगितले



त्यानंतर आयएमसी चेअरमन श्री राज शेखर हिप्परगी साहेब यांच्या हस्ते प्रत्येक प्रवेशित ट्रेड मधील प्रशिक्षणार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. नवीन प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी व त्यांच्या रोजगार करियर साठी आयएमसी चेअरमन साहेब यांनी शुभेच्छा देऊन भविष्याच्या वाटचाली बद्दल व भविष्यातील सुवर्णसंधी बद्दल महत्त्वपूर्ण माहिती दिली यावेळी संस्थेचे शिल्पदेशक श्री दिनेश मंठाळे सर श्री घोडके सर श्री लंबे सर श्री बगले सर श्री कोनापुरे सर श्री बिराजदार सर व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**मुस्लिम समाजाला सुद्धा आरतीचा दिला जातो मान**



## श्री लोकमान्य तरुण मंडळ सर्व जाती धर्मांना सामावून घेणारे मंडळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील एक आदर्श तरुण मंडळ म्हणून श्री लोकमान्य तरुण मंडळ प्रसिद्ध आहे. या मंडळाची स्थापना ३१/०८/१९९२ यावर्षी झाली. या मंडळामध्ये सर्व जाती, धर्मांचे नागरिक असून १७ पगडी जातींना घेऊन हा मंडळ आज सुद्धा दिमाख्यात उभा आहे.

हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला हा मंडळ आज मुस्लिम समाजाला सुद्धा आरतीचा मान दिला जातो हे वैशिष्ट्य आहे.

मुस्लिम समाज सुद्धा या सणांमध्ये आनंदाने सहभागी होतात.

ना कुठला गर्व, ना कुठली प्रतिष्ठा, ना कुठला मान, सन्मान, या मंडळामध्ये नसून सर्वजण एकत्र येऊन मंडळाचे प्रश्न सोडवले जातात.

या मंडळांनी आतापर्यंत रक्तदान शिबिर, नाटिका द्वारे समाज प्रबोधन, हिप्नॉटिझम, संगीत खुर्ची, असे बरेच उपक्रम आतापर्यंत राबवलेले आहेत.

याच्या कार्याची दखल घेऊन या मंडळाला २०१८ वर्षी कुरुंदवाड पोलीस स्टेशन मार्फत गणराया अवार्ड मिळाला.

सर्वप्रथम या मंडळांने गावामध्ये महाप्रसादाची सुरुवात केली. गुण्या गोविंदाने सर्व लहान बालके, स्त्रिया, पुरुष, एकत्र येऊन गणपती सण साजरा केला जातो.

टाकळीवाडी चा मानबिंदू म्हणून ओळख निर्माण आहे. आतापर्यंत विविध देवदेवतांच्या रूपातील १३ फुटापर्यंतच्या मूर्ती स्थापन करण्यात आलेले आहेत.

## पुणे जिल्हा भाजपच्या ग्रामीण (दक्षिण) सरचिटणीसपदी गंगाराम दादा जगदाळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर /प्रतिनिधी : डॉ विनायक गायकवाड

मौजे गराडे ता. पुरंदर चे माजी आदर्श सरपंच तसेच आदर्श सदस्य पुणे जिल्हा परिषद. व पुणे जिल्हा कात्रज दूध संघांचे माजी संचालक मा. श्री संदीप उर्फ गंगाराम दादा जगदाळे यांची पुणे जिल्हा दक्षिण च्या भाजप पक्षाच्या सरचिटणीस पदि निवड. त्यांचा जनसंपर्क फार मोठा आहे. त्यांच्या निवडिमुळे त्यांचे विविध सामाजिक संघटनाकडून अभिनंदन होत आहे.

# शहर-जिल्ह्यात ठिकठिकाणी गौराईचे आगमन

## ज्येष्ठा गौरी आवाहन निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ज्येष्ठा गौरी आवाहन निमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हि-याचा कंगनजोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, मारवाडी पेट्याचा मोत्याचा हार, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, मोहनमाळ, मोहरांची माळ, तुळ-शीची माळ, नाम निळाचा तसेच श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या म ाळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.



याशिवाय, आज राधाष्टमी (श्री राधिक मातेचा जन्म दिवस) असल्याने मंदिरातील श्री राधिकामातेस पांढरा पोशाख व सोन्या मोत्याचे अलंकार परिधान करण्यात आले व गुलाल टाकून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये सोन्याचा नक्षी टोप, म ोत्याचा कंठा, खड्याचा पाटल्या जोड, मोत्याचे मंगळसुत्र, बाजीराव गरसोळी इत्यादी अलंकाराचा सम ावेश आहे.

यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.प्रकाश जवंजाळ व विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते. तसेच रात्री ८.०० वाजता श्री राधिकामाते समोर भजन केले जाणार आहे.

## जावळीचे सरपंच सुरेखा मोहनराव यादव यांनी केले महालक्ष्मी पुजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


औसा प्रतिनिधी/ अमर जाधव :

औसा तालुक्यातील जा-वळी गावच्या कर्तव्यदक्ष विकासभिमुख नेतृत्व असलेल्या सरपंच सौ. सुरेखा मोहन यादव यांनी आपल्या स्वगृही केले गौरी गणपतीची प्रततिष्ठापणा , श्रावण महिण्यातील भाद्रपद मध्ये गणपती व तिन दिवसीय माहेर वासीनी महालक्ष्मीची स्थापणा केली जाते ,सरपंच सुरेखा यादव यांनीही आपल्या घरी विधीवत गणपती व महालक्ष्मीची स्थापणा करुन सामनिक पुजन करत जा-वळी गावात सुख शांती नांदावी व गावातील शेतकरी बळीराजा सुखी समृद्ध व्हावा यासाठी म हालक्ष्मीला साकडे साकडे घात-ले. यावेळी जावळी मुगळेवाडी गावच्या सरपंच सुरेखा मोहनराव यादव ,सुशिला आळणे प्रतिभा हेंबाडे शामल यादव, शशिकला बनसोडे अंजली यादव, महानंदा मुगळे वैशाली मुगळे, मनिषा म ुगळे, राधा यादव ,दमयंती यादव छबुबाई मोरे ,सुमन साळुंखे



कलावती सूर्यवंशी, प्रतिभा हेंबाडे अंजली यादव ,जयाताई यादव महानंदा मुगळे, ममता म ुळे, सरोजा साळुंखे सह जावळी येथील असंख्य महिला उपस्थीत होत्या.

## औसा येथे शिक्षीका आशाबाई सदाशिव कांबळे (म्हेत्रे) दांपत्यानी केले महालक्ष्मी पुजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी अमर जाधव

श्रावण महिन्यात भाद्रपदेत हिंदु संस्कृतीत अनेक सण साजरे केले जातात त्यातच सर्वांचा आवडता सण म्हणजे गणपती व गौरी महालक्ष्मी या सणासाठी महिला विशेष महत्व देत पंधरा दिवस लगबग करत घर साफसफाई ते फराळ करतात .सुंदर मखर सजावट ,नवनविन विद्युत रोषनाई ,करत रांगोळी काढुन गोड धोड करत मोठ्या उत्साहाने गौरी गणपती हा सण साजरा केला जा-तो.आज औसा येथे तांबरवाडी-राजेवाडी जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या राजेवाडी च्या मुख्याध्यापीका आशाबाई म्हेत्रे यांनी सहकुटुंब गौरी (महालक्ष्मी ) पुजन स्वग्रही करुन गणपती व गौरी म हालक्ष्मी चे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या घरातील, सौ.आशा सदाशिव कांबळे, श्री.सदाशिव मच्छिंद्रनाथ कांबळे, सासूबाई शालुबाई मच्छिंद्रनाथ कांबळे,नणंद पार्वती श्रीपती डपाळ, जाऊ सौ स्वाती मल्लिनाथ कांबळे , मुलगी सौ मयुरी किरण डपाळ कु. अनिशा ,मयुरी ,शर्वरी , प्रणिता, मुलगा चि. सर्वेश,कु.दिवीजा तुगाव,कु. साक्षी सह कुटुंबातील सदस्यांनी महालक्ष्मी पुजन करुन आशिर्वाद घेतला.

## ज्येष्ठा गौरी पुजन निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : ज्येष्ठा गौरी पुजन निमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, मोत्याचा तुरा, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हि-याचा कंगनजोड, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, झनक हार, एकदाणी, पदकासह लॉकेट, तांदळ्या हार, तुळशीची माळ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तुळशीची माळ, सुर्यकळ्याचा हार तसेच श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड




जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.

## वागदरी व परिसरात गौरी लक्ष्मी चे उत्साहात स्वागत : आकर्षक सजावट करून विविध गोडधोड पदार्थासह फळानी लक्ष्मी पूजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : गणरायाच्या अगमनानंतर लगेचच एक दोन दिवसानी गौरी लक्ष्मी चे आगमन तुळजा-पूर तालुक्यातील वागदरी व परिसरातील गावांमध्ये सोनप-ावलाने आगमन झाले असून अत्यंत मनोभावे भाविक भक्तांनी आपापल्या घरी गौरी लक्ष्मीचे स्वागत उत्साहाने केले.

प्रतिवर्षा प्रमाणे याही० वर्षी गौरी लक्ष्मी चे आगमन होताचं वागदरी व परिसरात ज्यांच्या घरी लक्ष्मी बसवली जाते तिथे सुगंधी अगर बत्ती, फ ुल, निरंजन पेटवून आपापल्या



परिणे आकर्षक सजाव-ट व विदूत रोषणाई करून, गोडधोड पदार्थ, फळे, फ ुले, पुरण पोळीचे नैवद्द ठेवून गौरी लक्ष्मी चे पुजन करुन उत्साही वातावरणामध्ये गौरी लक्ष्मीचा सण साजरा करण्यात आला.

## मुंबईसह कल्याण डोंबिवली नंतर आता शहापूरमध्ये देखील परप्रांतीयांची दादागिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर प्रतिनिधी/दिनेश घनघाव :

रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी शहापूर मध्ये परप्रांतीय आणि शहापूर मधील नागरिकांत जोरदार भांडण.




मुंबईसह कल्याण डोंबिवली परिसरात परप्रांतीयांनी मुजा-ेरी केल्याच्या आतापर्यंत अनेक घटना घडल्या आहेत.अशीच घटना आता शहापूरमध्ये घडली आहे.या घटनेत मराठी रिक्षाचालकाचा दुकानात काम करणाऱ्या मजूरामध्ये वाद झाला होता.या वादातून मजूराने मराठी माणसाला शिविगाळ आणि मारहाण केल्याची घटना घडली आहे.या म ारहाणीत ते गंभीररित्या जखमी झाले आहेत. गणपत गोरे असे या जखमी व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी शह-ापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा अधिक तपास पोलिस करीत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार,

आसनगावमध्ये राहणारे गणपत गोरे हे रिक्षाचालकाच काम करतात. आज गणपत गोरे हे शहापूर मधील पटेल किराणा दुकानात सामान घ्यायला गेले होते. दुकानातून सामान घेतल्यानंतर त्यांनी ते सामान रिक्षात टाकूण देण्यास दुकानदाराला सांगितलं होतं. त्यानुसार दुकानदाराने आपल्या मजुराला सामान रिक्षात टाकायला सांगितलं.त्यानुसार मजूराने सामना रिक्षात टाकले. पण हे सामान रिक्षात टाकल्यानंतर अस्थव्यस्थ झालं होतं. त्यामुळे गोरे यांनी मजूराला सामान नीट ठेवण्याची विनंती केली.

पण या दरम्यानच गणपत गोरे आणि मजूरामध्ये बाचाबाची झाली. या बाचाबाचीत मजूराने गणपत यांना शिविगाळ केली होती.या शिविगाळाचा जाब विचारायला गेलेल्या गणपत गोरे यांच्यावर नंतर मजूराने सामान भरण्याच माप डोक्यात मारलं होतं.त्यामुळे गोरे यांच्या डोक्याला गंभीर दुखाप झाली होती. त्यामुळे त्यांना तत्काळ उपचारासाठी शहापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.यावेळी उपचारानंतर्गत गणपत गोरे यांच्या डोक्याला ७ ते ८ टाके पडल्याची माहिती आहे.

या घटनेनंतर शहापूर पोलिस स्टेशन समोर मराठी युवकांची मोठी गर्दी करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली होती. या मागणीनंतर गणपत गोरे यांच्या तक्रारीवरून आरोपी राजस्थ-ानी मजूर चिमणराव चौधरी याच्यावर शहापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा अधिकचा तपास शहापूर पोलिस करत आहेत.

## गजानन सोशल अँड स्पोर्ट्स क्लबच्या वतीने सामाजिक उपक्रमाद्वारे गणेश उत्सव साजरा करण्याचा उपक्रम स्तुत्य : तहसीलदार शिल्पाताई ठोकडे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गणेशोत्सव व सामाजिक एकतेचा संदेश देणारा सण असून गजानन सोशल अँड स्पोर्ट्स क्लब च्या वतीने सामाजिक उपक्रमाद्वारे गणेशोत्सव साजरा करण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे मत करमाळ्याच्या कर्तवदक्ष तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी व्यक्त केले, गजानन सोशल अँड स्पोर्ट्स क्लब वेताळ पेठ करम ाळा यांच्या वतीने आयोजित रक्त नेत्र तप-ासणी मोतीबिंदू रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास शिबिराची आयोजक गजानन सोशल अँड स्पोर्ट्स क्लब ची संस्थापक अध्यक्ष मा. नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, संजीवनी हॉस्पिटलचे डॉक्टर सुहास कुलकर्णी, गजानन स्पोर्ट्स क्लब ची सदस्य उपस्थित होते, यावेळी पुढे बोलताना शिल्पाताई ठोकळे म्हणाले की गजानन स्पोर्ट्स क्लब ने मोफत रक्त तपासणी शिबिर, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, आयोजन करून जे लोक रंजले गांजले त्याशी म्हणे जो आपला तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावाया वृत्ती प्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना खऱ्या अर्थाने नवजीवन देण्याचे काम केले असून गणेश मंडळांनी अशा पद्धतीचे उपक्रम राबवून समाज कल्याणाचा वसा जपावा या दृष्टिकोनातून या मंडळाचा मला विशेष अभिमान वाटत असून त्यांच्या सामाजिक धार्मिक कार्यासाठी आपण स्वरूप तोपरी सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या रक्तदान शिबिरामध्ये ९४ रक्तदात्यांनी रक्तदान केली तर नेत्र तपासणी ७३ लोकांची करण्यात आली असून बऱ्याच नागरिकांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी पाठवण्यात आले आहे. सर्व रक्ताची तप-ासणीमध्ये १३५ नागरिकांची करण्यात आली आहे. या आरोग्य शिबिरामध्ये ३०२ जणांनी सहभाग घेतला यावेळी बोलताना प्रशांत ढाळे यांनी सांगितले की मंडळाचे २६ वर्ष असून या मंडळात सर्व जाती धर्मांची युवक कार्यकर्ते असून तन-मन धनाने गणेशा प्रति भक्ती भाव ठेवून समाधीच्या कल्याणासाठी काम करत असतात त्यामुळे आमचे मंडळ एक कुटुंबाप्रमाणे असल्याची त्यांनी सांगितले. नागरिकांचे आरोग्याची विशेष काळजी घेत आरोग्य शिबिर घेतल्यामुळे करमाळा शहर व तालुक्यातील जनतेकडून गजानन सोशल अँड स्पोर्ट्स क्लबचे करम ाळा शहरतालुक्यातून कौतुक होत आहे.



## अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांना अर्थिक मदत मिळावी : माजी नगराध्यक्ष गजानना सुर्यवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : शहरात संतधर मुसळधार पावसाचा वेग वाढुन मध्यरात्री अचानक पाण्याच्या सखल भाग व उतरत्या भागात पाण्याच्या प्रवाहात वाढ झाली यामध्ये अनेक कुटुंबाचे नुकसान झाले. यामध्ये अनेक घरांत पाणी शिरले, व्यापारी दुकान, किरकोळ दुकानदार, मेकानिकच्या टिन शेडचे अतोनात नुकसान झाले या अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी लोहा न.प. चे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष तथा भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे केली.

लोहा शहरातील शेतीतील पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले, तसेच अनेक नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरून घरा-तील संसारपयोगी वस्तु, अन्न, धान्य आदीचे नुकासान आणि दुकानामध्ये पाणी शिरल्यामुळे व्यावसायीकांचे मोठे नुकसान झाले. तसेच पुर परिस्थीती निर्माण झाल्यामुळे घरासमोरील दुचाकी, चारचाकी वाहने वाहुन गेल्यामुळे झालेले नुकसान व जनावरे दगा-वली आहे. तसेच पुराच्या पाण्याम ुळे शहरातील रस्त्यावर खड्डे पडले आहेत, लोहा शहरातील स्म शानभुमीची संरक्षण भिंत पुरामुळे वाहुन गेली व आतील पेवरब्लॉक सुध्दा वाहुन गेली, असे कार्यकर्ते लक्ष्मण फुलवरे म्हणाले.

**विवेकानंद प्रतिष्ठान व्याख्यानमाला - पुष्प - ५**

## अक्कलकोटकरांची सांज ठरली अविस्मरणीय; लोकगीत कधीच संपणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : लोकगीत गावा गावापर्यंत पोहचले आहे लोकगीत कधीच संपणारे नाही लोक गीताचा प्रारंभ कोकणातुन झाला आहे गायका बरोबर वादक चांगला असेल तर गायकाला स्फुर्ती चढते . दोघेही उत्तम असेल तर लांगल्या गायनाची निर्मीती होते चोखदळ प्रेक्षक व त्यांच्या कडून मोठा प्रतिसाद मिळाल्यास कला परमोच्य शिखर गाठते असे प्रतिपादन निर्माते संकल्पना निवेदक स्वप्निल रास्ते यांनी केले.

निर्मिती व निवेदक स्वप्निल रास्ते यांच्या उत्सव लोक गीतांच्या कार्यक्रमात गायक कलाकार सुजित सोमण, वेदिका दामले अमिता घुगरी यांनी सादर केलेल्या रसीक श्रोत्यांच्या ओठावरील गीतांनी अक्कलकोटकरांची सांज अविस्मरणीय ठरली.

विवेकानंद प्रतिष्ठान अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वतीने गणेशोत्सवा निमित्य आयोजित व्याख्यानमालेत ५ वे पुष्प लोक गीतांच्या कार्यक्रमाने गुंफण्यात आल.

प्रारंभी दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजन संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी प्रा भिमराव साठे, मुकुंद पतकी, बसवराज शास्त्री - तिर्थ , राचप्पा वागदरे, मनोहर चव्हाण ओमप्रकाश तळेकर आदि च्या शुभहस्ते करण्यात आले.

निवदेक स्वप्निल रास्ते व सहकारी याचा सत्कार संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी सर्व कलाकारांच परिचय बापुजी निंबाळकर यांनी करून दिला.

या प्रसंगी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी, शिवशरण जोजन, अशोक येणगुरे म ल्लिकार्जुन आळगी अमोल कोकाटे, म लकप्पा भरमशेट्टी, चंद्रकांत दसले, दयानंद परिचारक, सिद्ध-ाराम मसुती, महेश कापसे, निलकंठ कापसे मल्लीनाथ मसुती गुरुपादप्पा आळगी ओंकार पाठक महावीर येणगुरे सुनील दसले गणेश सरवसे राजशेखर उमरणीकर आदि बहुसंख्य रसिक श्रोते महिला वर्ग उपस्थित होते.

**विवेकानंद प्रतिष्ठान अनेक लोक उपयोगी उपक्रम राबविते. गणेशोत्सव व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते गायक संगीतकार यांची हजेरी लागत आहे याचे आयोजन संयोजन निट नेटकेपणा भव्य दिव्य आहे लोक जागृतीचे काम मोलाचे आहे . प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली हे काम चालु आहे ही अंत्यत गौरवाची बाब असल्याचे निर्माते निवेदक स्वप्निल रास्ते याप्रसंगी म्हणाले.**




**गणेश वंदना 'छत्रपती' शिवरायाची आरती ' गण 'गौळण' भुपाळी जांभुळ पिकल्या झाडाखाली' आम्ही ठाकर या रानाची पाखर ' धनगराची मेंढर व पोहाडे अशी प्रेक्षकाच्या ओठावरील लोक गीत सादर करून श्रोत्यांची मोठी वाहवा मिळवली.**